# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

## (सकाळ)

जा.क्र. ३१८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २२/०६/२०१८

**१) निवडणुकीचे कारणा वरून डोक्याचे केस ओढुन जमीनीवर पाडुन जिवानीशी ठार मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंदः--**

दिनांक २०/०६/२०१८ चे २२.०० वाजता दरम्यान यातील आरोपीतांनी संगनमत करून ग्रामपंचायत निवडणुकीचे वादा वरून अगोदर फिर्यादीचा मुलगा महेश देशमुख यास शिवीगाळ करून त्याचे कॉलर पकडुन लाताबुक्यानी मारहान करून त्यानंतर फिर्यादीचे घरात प्रवेश करून आरोपी क्र. २ ने फिर्यादीचे डोक्याचे केस ओढतान करून तिला खाली जमीनीवर पाडले, तिला व तिचे मुलाला जिवानीशी ठार मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३५४,४५२,३२३,५०४,५०६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चुटे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**२) अश्लिल शब्दात बोलुन विनयभंग करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंदः--**

दिनांक २१/०६/२०१८ चे ०७.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हिने आरोपी क्र. १ यास अंगणात फावडयाने गिट्टी उचलत असता अंगणात खड्डा पाडु नको अशी फिर्यादी बोलली असता, आरोपीने अश्लिल शब्दात बोलुन अंगावर धावुन तिचे निवयभंग केले व आरोपी क्र. १ ते ३ यांनी संगनमत करून ही आमची कोण लागली हिला सुखाने खावु देणार नाही असे म्हणुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३५४,५०४,५०६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोंगाडे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**३) विवाहीतेला शारीरीक व मानसीक त्रास देवुन काठीने मारून गंभिर दुखःपत केल्याने गुन्हा नोंदः--**

दिनांक ०५/०५/२०१८ चे २१.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हिचे पती आरोपी हे नेहमी घरगुती कारणा वरून फिर्यादी सोबत मारपीट करून शारीरीक व मानसिक त्रास देतात घटने वेळी आरोपने मुलगा आयुश याचे गालावर थापड मारल्याने फिर्यादीने आरोपी पतीस मुलाला कशाला मारले असे बोलली असता फिर्यादीस थापड बुक्याने व काठीने उजव्या पायावर मारून गंभिर दुखःपत केली अशा फिर्यादीचे रिपोर्ट व चौकशी अहवाल आणी डॉ. एक्स--रे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ४८९(अ), ३२५ भादवी. भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भुसावळे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**४) दोन मोटार सायकलची चोरीः--**

दिनांक २१/०६/२०१८ चे १४.०० वाजता दरम्यान यातील कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन लक्ष्मीरमा मंगल कार्यालय येथुन फिर्यादीची मोटार सायकल क्र. एमएच ४० एएन ६४०५ पॅशन प्रो काळया रंगाची किमती ४०,०००/रु. ची व फिर्यादीचे भाऊजी सुरज बंडुजी पचारे रा. शंकरपुर जि. चंद्रपुर यांचा मोटार सायकल क्र. एमएच ३१ व्हीएस ९६३७ कि. ३०,०००/रु. हिरो होन्डा स्प्लेंडर प्लस अशा दोन मोटार सायकल चोरून नेल्याने फिर्यादी सुरज शेषराव नागपुरे वय २१ वर्ष रा. बाम्हणी रेल्वे जि. नागपुर यांच्या तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**५) शेतात लागलेली मोटार पंपच्या कॉपर वायरची चोरीः--**

दिनांक १३/०६/२०१८ ते दि. १६/०६/२०१८ चे १६.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी याचे शेतात मोटार पंपाला लावलेले १७५ मिटर कॉपर वायर, ३ नग मेन ग्रिप असा एकुण ४,९४०/रु. चा माल कुणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरून नेल्याने फिर्यादी लक्ष्मींकात दिनकरराव बोहटे वय ५६ वर्ष रा. रविंद्रनाथ टागोर वार्ड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोगे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**६) निष्काळजीपणे वाहन चालवुन बकरीचे पिल्याला धडक मारून नुकसान केल्याने गुन्हा नोंद :--**

दिनांक १०/०६/२०१८ चे १४.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याच्या ताब्यातील मोटार सायकल हयगयीने व निष्काळजीपने चालवुन फिर्यादीचे बकरीचे पिल्याला धडक मारून १५,००/रु. चे नुकसान केल्याने फिर्यादी सौ. द्वारकाबाई मारोती चौधरी वय ६० वर्ष रा. राजापुर यांचे तोंडी रिपोर्ट व स्टे.डा. सान्हा क्र. १९/१८ दि. १०/०६/२०१८ चे नोंदनी नुसार आज रोजी डॉक्टर कडुन क्युरी रिपोर्ट प्राप्त झाल्याने पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम २७९,४२९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.ना. साकुरे पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत.

**७) पैश्याचे कारणा वरून वाद करून डोक्यावर विट मारून गंभिर जखमी केल्याने गुन्हा नोंद :--**

दिनांक २१/०६/२०१८ चे १६.०० वाजता दरम्यान यातील आरोपीने फिर्यादीचा मित्र अनिल शंकर बारसागडे वय २७ वर्ष याचे सोबत पैशाचे कारणा वरून वाद करून डोक्यावर विट मारून गंभिर जखमी केल्याने फिर्यादी रमाकांत खेमदास बागडे वय २४ वर्ष रा. निघवी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चुटे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**८) काठीने मारून जखमी करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :--**

दिनांक २०/०६/२०१८ चे २२.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही पती सोबत जेवण करीत असता आरोपी हा गावामधुन दारू--पाणी पिवुन आला व म्हाणाला की, 'मी लावलेला दरवाजाचा ताला कसा फोडलीस तुझ्या पासुन नास आहे तु घर बिघडवीतेस' असे बोलुन थापड--बुक्यानी मारपीट करून अंगणात ठेवलेल्या काठीने फिर्यादचे डोक्यावर चेह--यावर व डोक्यावर मारून जखमी केले तसेच पतीला शिवीगाळ मारपीट करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने, फिर्यादी सौ. चंद्रकांता बाळकुजी नेवारे वय ४५ वर्ष रा. बाजारटोला डोंगरी बु. यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३२४,३२३,५०४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. लिल्हारे पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत.

**९) विष प्राशन करून औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु :--**

दिनांक २०/०६/२०१८ चे १०.४५ वाजता दरम्यान यातील मृतक मधुकर नत्थु फुंडे वय ३० वर्ष रा. कुर्झा याने दि. १५/०६/२०१८ चे १८.३० वा. दरम्यान विष प्राशन केल्याने त्यास त्याचे नातेवाईकांनी औषधोपचारा करीता सा.रू. भंडारा. येथे भरती केले असता, उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरून पो.स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदी पत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पो.ना. रामटेके याचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पो.ना. कळपते पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**१०) विज पडुन तरूनीचा मृत्यु :--**

दिनांक २०/०६/२०१८ चे १७.४५ वाजता दरम्यान यातील मृतक कु. पुजा सुरजलाल ठाकरे वय १९ वर्ष रा. पाचगाव ही तिचे आई सोबत पाचगाव शेत शिवरात शेतात तुरी लावण्याकरीता गेली होती नमुद वेळी पावसाचा वातावरण जमल्याने आकाशात ढगाळ वातावरण होवुन विजाचा कडकडाट सरू झाल त्या दरम्यान मृतकचे समोर विज पडल्याने ती जागगेवर बेशुध्द पडली तिला औषधोपचारा करीता प्राथमीक आरोग्य केंद्र वरठी येथे आणले असता, तेथिल एमओ सा. यांनी तिचे वर विज पडुन मृतकचा मृत्यु झाला आहे. असे सांगीतल्याने फिर्यादी नंदेश्वर सुरचजंद टेंभरे वय २७ वर्ष रा. पाचगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम १७४ जाफौ. मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोंदे पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**११) सर्प द्वंशाने महिलेचा मृत्यु :--**

दिनांक १९/०६/२०१८ चे १५.०५ वाजता दरम्यान यातील मृतक सौ. गौराबाई सुखराम वरठे वय ५०वर्ष रा. जांब हिला विषारी सापाने चावा घेतल्याने तिला औषधोपचारा करीता सा. रू. भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरून पो.स्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जा. फौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. परतेती यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम १७४ जाफौ. नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. मोदनकर पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

**१२) विषारी औषध प्राशन करून महिलेचा मृत्यु :--**

दिनांक १९+२०/०६/२०१८ चे ११.०० वाजता दरम्यान यातील मृतक सौ. ममता देवराम भलावी वय ३९ वर्ष रा. एकोडी हिने दि. १९/०६/२०१८ चे ०९.५० वा. दर. कोणतेतरी विष प्राशन केल्याने तिला औषधोपचारा करीता सा. रू. भंडारा येथे भरती केले असता दि. २०/०६/२०१८ ला ११.०० वा. उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरून पो.स्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जा. फौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. लेंडे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १७४ जाफौ. नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. गोंळागे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.